# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.01.2025** **वारःशनिवार**

1. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार
2. सहकार चळवळीच्या विस्तारासाठी शिस्त आणि व्यावसायिकता गरजेची - केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा
3. एसटीच्या प्रवास भाड्यात सुमारे 15 टक्के वाढ
4. भंडारा इथल्या आयुध निर्माण कंपनीमध्ये भीषण स्फोटात आठ जणांचा मृत्यू आणि
5. वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतला इंग्लंडविरूद्धचा दूसरा सामना आज चेन्नई मध्ये होणार

**<u>राष्ट्रपती</u>**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज संध्याकाळी 7 वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार आहेत. त्याच्या भाषणाचं थेट प्रसारण होणार असल्यानं, आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन दररोज संध्याकाळी 7 वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज संध्याकाळी 6 वाजून 45 मिनिटांनी प्रसारित होईल. राष्ट्रपतींच्या भाषणानंतर त्याचा इंग्रजी अनुवाद आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन प्रसारित केला जाईल. साडेनऊ वाजता आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन प्रादेशिक भाषांमधला अनुवाद प्रसारित केला जाईल.

**<u>पंतप्रधान-संवाद</u>**

प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात सहभागी होत असलेले राष्ट्रीय छात्र सेना म्हणजे एनसीसीचे छात्र, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, आणि चित्ररथांच्या कलाकारांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आपल्या निवासस्थानी संवाद साधला. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी सर्व नागरिकांनी अत्यंत जबाबदारीनं आपापली कर्तव्य पार पाडणं आवश्यक आहे, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. आपल्या देशातील विविधता आणि राष्ट्रीय एकता या मुद्द्यांवर त्यांनी भर दिला. सर्वच सहभागींनी विविध राज्यांच्या लोकांशी संवाद साधून एक भारत श्रेष्ठ भारत भावनेला बळकटी द्यावी असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**<u>पाहुणे प्रजासत्ताक</u>**

इप्रजासत्ताक दिन सोहळ्याचं नवी दिल्लीतल्या कर्तव्य पथावर होणारं संचलन पाहण्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातून अनेक मान्यवरांना, विविध योजनांच्या लाभार्थींना आमंत्रित करण्यात आलं आहे. पुण्याजवळील तळेगाव दाभाडे इथल्या नूतन अभियांत्रिकी महाविद्यालयात संगणक अभियांत्रिकी विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रीतम अहिरे यांनाही प्रजासत्ताक दिनाच्या संचलन कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आलं आहे. हा अनुभव आपल्यासाठी अविस्मरणीय असल्याची भावना अहिरे यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली. ते म्हणाले......

**मी आय पी आर थ्रू म्हणजे जे कॉपीराईट झाले, जे पेटंट झाले जे रिसर्च पेपर पब्लिकेशन झाले. याच्या थ्रू त्यांनी पूर्ण भारतातनं दहा लोकांना त्यांनी रिकॉग्नाइज केलेलं आहे, आणि आपल्या महाराष्ट्रातनं एकच आहे आय पी आर थ्रू आणि त्याच्यामध्ये त्यांनी मला शॉर्टलिस्ट केल्यामुळे मी त्यांचा खूप आभार आहे. लास्ट पाच वर्षामध्ये कॉपीराईटच्या संदर्भामध्ये मी स्वतः जवळपास साडेतीनशेपेक्षा जास्त कॉपीराईट हे रजिस्टर केलेले आहेत, आणि मला सांगताना खूप आनंद होईल की आमच्या कॉलेजचा एक पहिला जो वर्ल्ड रेकॉर्ड आहे, तो कॉपीराइट फाइलिंग चा आहे की त्याच्यामध्ये दोनशे एकवीस कॉपीराईट हे आम्ही एकाच दिवशी फाईल केले होते. तर मला 26 जानेवारीच्या निमित्ताने भारत सरकारने**

**जे बोलावले आहे दिल्लीमध्ये एक स्पेशल गेस्ट म्हणून त्याच्यामुळे भारत सरकारचा, आयपीआर कमिटी यांचा, आयपीआर सीईओ आपले भारत सरकार आपले पंतप्रधान राष्ट्रपती आणि मुख्यमंत्री या सगळ्यांचा खूप खूप आभारी आहे.**

**शहा-मुंबई**

सहकार चळवळीच्या विस्तारासाठी शिस्त आणि व्यावसायिकता गरजेची असल्याचं मत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी काल मुंबईत व्यक्त केलं. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. प्रत्येक व्यक्ती सहकारी चळवळीत जोडला जाऊन खऱ्या अर्थानं सहकारातून समृद्धी आणण्यासाठी प्रयत्न करू, असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. येत्या अर्थसंकल्पात गुजरात मधले ज्येष्ठ सहकारी नेते त्रिभुवन दास पटेल राष्ट्रीय सहकार विद्यापीठाची घोषणा होईल, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी अमित शहा यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्षातील कार्यक्रमाची दिनदर्शिका, राष्ट्रीय शहरी सहकार वित्त आणि विकास महामंडळाच्या मुंबईतील कार्यालयाचं उद्घाटन झालं. सर्व शहरी सहकारी बँकांसाठी ही अग्रणी संस्था म्हणून काम करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ग्रामीण भागात रोजगार आणि स्वयंरोजगार वाढीला लागण्यासाठी सहकार चळवळ मोठी भूमिका बजावेल असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. तर सहकार चळवळीतील संस्थांनी पारदर्शकपणे पुढे जावे अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

**नाशिक-सहकार परिषद**

नाशिक जिल्ह्यात मालेगाव तालुक्यातल्या अजंग इथं झालेल्या सहकार परिषदेलाही केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा काल उपस्थित होते. सहकाराच्या माध्यमातूनच शेतकऱ्यांच्या उन्नतीचा मार्ग समृद्ध होऊन शेतकरी आत्मनिर्भर होईल, त्यासाठी शेतीला विज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड देणं आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारनं सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत, असं सांगून ते म्हणाले....

**आज नरेंद्र मोदी जी ने सहकारिता मंत्रालय का गठन किया, चीनी मिलों के लिए एथेनॉल की योजना लाए, इनकम टैक्स का मसला हल किया, पैक्स का कंप्यूटराइजेशन किया, पैक्स के मॉडल बायलॉस आए और पैक्स को मल्टीडायमेंशनल गतिविधियों के साथ जोड़ने का काम नरेंद्र मोदी जी ने किया है। और मोदी जी ने अब जो सहकारिता मंत्रालय बनाया है। वो सहकारिता मंत्रालय ने ऑर्गेनिक खेती करने वाले किसानों के उपज को पैकेजिंग और मार्केटिंग के लिए भारत ऑर्गेनिक कॉआपरेटिव लिमिटेड बनाया है। ये ऑर्गेनिक कॉआपरेटिव लिमिटेड मल्टी नेशनल होगा सर्टिफिकेट वाले किसानों की सारी उपज वो खरीद लेगा और इसको बेचकर जो मुनाफा आएगा वो सीधा किसानों के अकाउंट में डायरेक्ट जमा करने की व्यवस्था की है।**

**भाडेवाढ-मुंबई**

एसटी महामंडळानं प्रवास भाड्यात 14 पूर्णांक 97 शतांश टक्के वाढ केली असून ही दरवाढ कालपासून लागू झाली. येत्या एक फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीचीदेखील भाडेवाढ होणार आहे. ही तीन रुपयांची असेल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल बातमीदारांशी बोलताना सांगितलं. दोन हजार कोटी रुपयांची देणी, तसंच कर्मचाऱ्यांचे पगार, यासह इतर कारणांमुळे एसटीची भाडेवाढ अपरिहार्य असल्याचं त्यांनी सांगितलं. भाडेवाढ होत असली तरी जुन्या योजना आणि सवलती कायम राहणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**कृत्रिम बुद्धिमत्ता**

कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असेल, असं, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री ॲडवोकेट आशिष शेलार यांनी काल सांगितलं. जागतिक शिक्षण दिनानिमित्त विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करण्याचा राज्य सरकारचा निर्णय ऐतिहासिक ठरणार आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा प्रकल्प राबवला जाईल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीने प्रेरित उद्योग आणि तंत्रज्ञान क्रांतीसाठी विद्यार्थ्यांना आणि तरुणांना आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करणारं हे विद्यापीठ असेल, असं त्यांनी सांगितलं.

**ऊर्जा सप्ताह**

भारत ऊर्जा सप्ताह 2025 हा कार्यक्रम 1 लाख चौरस मीटर क्षेत्रफळावर होणार असून सहभाग, प्रदर्शन, क्षेत्रफळ आणि सत्रांच्या दृष्टीनं हा जागतिक स्तरावरील दुसऱ्या क्रमांकाचा ऊर्जा कार्यक्रम ठरेल असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं. नवी दिल्लीतल्या यशोभूमी इथं 'भारत ऊर्जा सप्ताह 2025' चं 11 ते 14 फेब्रुवारी दरम्यान आयोजन करण्यात आलं आहे. त्याबाबत हरदीप पुरी यांनी काल माहिती दिली.

**अपघात**

भंडारा इथल्या आयुध निर्माण कंपनीमध्ये भीषण स्फोट होऊन आठ जणांचा मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. कंपनीमध्ये काम सुरू असताना काल सकाळी हा स्फोट झाला. ज्या ठिकाणी स्फोट झाला ती इमारत संपूर्णपणे जमीनदोस्त झाली असून जेसीबीच्या सहाय्यानं इमारतीच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही घटना कशामुळे घडली याचा तपास करण्यात येणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरेही तपासले जाणार असल्याचं प्रशासनाच्या वतीनं सांगण्यात आलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शोक व्यक्त केला आहे.

**निधन**

मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व रामचंद्र अण्णाजी उर्फ रामभाऊ जोशी यांचं गुरुवारी रात्री पुण्यात वृध्दापकाळानं निधन झालं. ते 101 वर्षांचे होते. अनेक दैनिकांमध्ये त्यांनी पत्रकार, मुख्य वार्ताहर यासह विविध पदांवर काम केलं. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या स्थापनेमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रामभाऊ जोशी यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**क्रिकेट**

पुरूष क्रिकेटच्या वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेतला इंग्लंडविरूद्धचा दुसरा सामना आज चेन्नईत होणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. सूर्यकुमार यादव च्या नेतृत्वाखालील संघानं मालिकेतला पहिला सामना सात गडी राखून जिंकला होता.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहण्याची तसंच आकाश मुख्यत: निरभ्र राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.